# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## National Service Scheme

Dr. V. S. Irpate
Programme Coordinator (I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 291 /2016

Dt: 01/08/2016

प्रति,

मा. प्राचार्य
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
संलग्नित सर्व रासेयो महाविद्यालये.

**विषय : दि.२१ ऑगष्ट, २०१६ रोजी आपल्या महाविद्यालयातील २ रासेयो स्वयंसेवक वसंतराव देशपांडे स्मृती सभागृह, नागपूर येथे आयोजित राज्यस्तरीय परिषदेमध्ये सहभाग घेण्यास पाठविण्याबाबत.**

संदर्भ :– डॉ. निहाल आर. शेख, संचालक विद्यार्थी कल्याण, रा.तू.म. विद्यापीठ, नागपूर यांचे पत्र दि. २५/०७/२०१६.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्रातील विद्यापीठीय विद्यार्थ्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूरोगामी व परिवर्तनशील विचारांनी व संविधानात्मक मूल्यांनी प्रेरित करणारी संमेलने/परिषदा राज्यातील चार विभागांत आयोजित करण्याच्या दृष्टीने विभागनिहाय समन्वयक विद्यापीठांतर्गत आयोजक विद्यापीठांचे क्लस्टर तयार करण्यात आले आहे. विभागतील एकुण सहा विद्यापीठांच्या वतीने राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सर्वंकष समाजविकास प्रबोधन अभियाना अंतर्गत **राज्यस्तरीय विद्यार्थ्यांची परिषद नागपूर येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृह येथे दि. २१ ऑगष्ट, २०१६ रोजी** आयोजित करण्यात आली आहे.

सदर राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये गोंडवाना विद्यापीठातर्फे एकुण १०० रासेयो स्वयंसेवक पाठवावयाचे आहेत. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयामधून २ स्वयंसेवकांची निवड करुन दि. ०४/०८/२०१६ पर्यंत संलग्नित नमूनापत्रानुसार MS-WORD मध्ये माहिती भरुन nssdsw.gug@gmail.com या ई–मेलवर पाठवावी. तसेच **"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित समाज व्यवस्थेची प्रस्थापना : वास्तव, आव्हाने व उपाय योजना"** या विषयावर गोंडवाना विद्यापीठातर्फे एका विद्यार्थ्याला परिसंवाद करावयाचा आहे. परिसंवादामध्ये सहभाग घेण्याकरीता उत्कृष्ट वक्ता असणाऱ्या रासेयो स्वयंसेवकाचे नांव याकरीता सुचवावे.

विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च व दैनंदिन भत्ता महाविद्यालयाच्या नियमित रासेयो अनुदातून करण्यात यावा.

कळावे.

धन्यवाद!

कार्यक्रम समन्वयक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना तथा
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहपत्र: प्रपत्र.

# विद्यार्थ्यांच्या परिसंवादात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | महाविद्यालयाचे नांव | भ्रमणध्वनी क्रमांक | निवासाचा सपूर्ण पत्ता | प्रवासाचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |